आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२८ एप्रिल २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यातलं मतदान उद्या

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाराणसी इथं सुमारे ६ हजार ३५० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी

- मराठी न येणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर कुठलीही कारवाई न करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- नाशिकमधल्या वृक्षतोडीला हरित लवादाची स्थगिती कायम

**आणि**

- राष्ट्रकुल युवा आणि कनिष्ठ गट भारोत्तोलन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पटकावली चार सुवर्णपदकं

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठीचं दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातलं मतदान उद्या होणार आहे. राज्यातल्या सात जिल्ह्यांमधल्या १४२ मतदारसंघात उद्या सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होईल. मतदान प्रक्रियेसाठीची तयारी पूर्ण झाली असून निवडणूक अधिकारी संबंधित मतदान केंद्राकडे रवाना झाले आहेत.

या टप्प्यात ३ कोटी २० लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. शेवटच्या टप्प्यात १ हजार ४४८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून यात २२० महिलांचा समावेश आहे.

मतदानाच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालमधे कडक पोलीस बंदोबस्त ठेवला आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे २ हजार ३२१ जवान बंदोबस्तासाठी तैनात केले आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अतिरिक्त आयपीएस आणि

डब्ल्यूबीपीएस अधिकाऱ्यांचीही नियुक्ती केली आहे. उपद्रव माजवण्याची शक्यता असणाऱ्या आठशे जणांना पोलिसांनी आज अटक केली. आतापर्यंत दोन हजार तीनशे जणांना अटक केली आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात वाराणसी इथे सुमारे ६ हजार ३५० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झाली. या प्रकल्पांमध्ये रेल्वे, रस्ते, जलव्यवस्थापन, आरोग्यसेवा, पर्यटन आणि शहरी पायाभूत सुविधा यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश आहे. या वेळी प्रधानमंत्र्यांनी महिला संमेलनातही सहभाग घेतला. दोन नवीन अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवून त्यांनी रवाना केलं. या 'अमृत भारत एक्सप्रेस' गाड्या बनारस-हडपसर, पुणे आणि अयोध्या-लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई दरम्यान धावतील. या प्रसंगी मोदी म्हणाले…

**होल्ड.. बाईट - नरेंद्र मोदी**

तसंच गंगेवरच्या रेल्वे-सह-रस्ते पुलाच्या बांधकामाचा समावेश असलेल्या 'वाराणसी - पंडित दीनदयाल उपाध्याय जंक्शन' दरम्यानच्या तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्ग प्रकल्पाची पायाभरणीही त्यांनी केली. या दौऱ्यात उद्या हरदोई इथे गंगा एक्सप्रेस वेचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

मराठी न येणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर कुठलीही कारवाई न करण्याचा किंवा त्यांचा परवाना रद्द न करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मात्र मराठी सक्तीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी १ मे ते १५ ऑगस्ट दरम्यान विशेष पडताळणी मोहिम राबवली जाईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. परिवहन विभागातल्या अधिकाऱ्यांची बैठक घेतल्यावर ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते….

**-- होल्ड बाईट सरनाईक - -**

या कालावधीत बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या, प्रवाशांची फसवणूक करणाऱ्या, तसंच नियमांचं उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कारवाई केली जाईल, असं सरनाईक यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

देशातल्या नागरिकांना आणि करदात्यांना सुलभ व्हावं, त्यांची सोय व्हावी यासाठी नवीन आयकर कायदा अंमलात आला असल्याची माहिती आयकर विभागाचे मुख्य आयुक्त विक्रम सहाय यांनी आज मुंबईत दिली. नवीन आयकर कायद्याविषयी जनजागृती करण्यासाठी घाटकोपरमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आयकर कायदे आणि आयकर यंत्रणा यात सुधारणा कारणासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं आश्वासन त्यांनी यावेळी दिले. नवीन आणि जुने आयकर कायद्याविषयी त्यांनी यावेळी उपस्थित व्यापारी, करदाते, कर सल्लागार यांच्या शंकांचे निरसन केले.

**<><><><><>**

दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेकी कारवायांविरोधात एकजुटीनं आघाडी उभारण्याची गरज असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज किर्गिझस्तानमध्ये बिश्केक इथं शांघाय सहकार्य संघटनेच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत बोलत होते. एखाद्या देशाच्या सार्वभौमत्वावर हल्ला करणाऱ्या सीमापार दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्यांकडे दुर्लक्ष करता कामा नाही, तसंच दहशतवादाला सुरक्षित आश्रयस्थान उपलब्ध करणाऱ्यांविरोधात शांघाय सहकार्य संघटनेनं कठोर कारवाई करायला हवी, असं ते म्हणाले.

राजनाथ सिंह यांनी आज या बैठकीच्या पार्श्वभूमीवर किर्गिझस्तानचे संरक्षण मंत्री मेजर जनरल मुस्तफायेविच यांची भेट घेतली.

**<><><><><>**

नाशिक शहरातल्या वृक्षतोडीच्या मुद्द्यावर हरित लवादानं यापूर्वी दिलेली स्थगिती कायम ठेवली आहे. नाशिक मध्ये कुंभमेळ्याच्या कामांसाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात येत असून यासंदर्भात मनीष बावीस्कर यांनी अर्ज दाखल केला होता. त्यावर दिलेला स्थगिती आदेश मागे घेण्याची मागणी नाशिक महानगरपालिकेनं केली होती, मात्र हरित लवादानं ती फेटाळून लावत १९ जूनपर्यंत वृक्षतोडीवरची बंदी कायम ठेवली.

शहरातल्या धोकादायक, किंवा कोसळण्याची शक्यता असलेल्या झाडांबाबत आपत्कालीन परिस्थितीत झाड तोडणं किंवा छाटणीसाठी परवानगीची तरतूद स्थगिती आदेशात समाविष्ट करण्याची विनंती महानगरपालिकेनं केली. यावर लवादानं, अशा आपत्कालीन प्रकरणांत स्वतंत्र अर्ज करून परवानगी मागता येईल, एवढीच मुभा दिली.

<><><><><>

सामोआ इथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल युवा आणि कनिष्ठ गट भारोत्तोलन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आज चार सुवर्णपदकं पटकावली. पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात सुनील सिंग याने २७१ किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकलं. अभिनोब गोगोई याने ७१ किलो वजनी गटात एकूण २८४ किलो वजन उचलून सुवर्णपदकावर नाव कोरलं. चारू पेसी याने पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावलं तर महिलांच्या ५८ किलो वजनी गटात १८५ किलो वजन उचलून ऐसांगफा गोगोई हिने सुवर्णपदक मिळवलं.

<><><><><>

थॉमस अँड उबर चषक बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय महिला संघाला चीनपुढं ५-० नं पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळे भारताचं या स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं आहे. महिला एकेरीत पी. व्ही. सिंधु हिला वांग झियी हिच्याकडून १६-२१, २१-१९, १९-२१ असा पराभव पत्कारावा लागला. प्रिया कोन्जेंगबाम आणि श्रुती

मिश्रा या जोडीचा लियू शेंग शू आणि टॅन निंग या जोडीने ११-२१, ८-२१ अशा गुणांनी पराभव पत्करावा केला. ट्रिसा जॉली आणि कविप्रिया सेल्वम या जोडीचा लुओ झू मिन आणि झांग शू शियान या जोडीने १०-२१, २१-१२, १९-२१ असा पराभव केला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज न्यू चंदिगडमधे पंजाब क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर पंजाब किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा पंजाब किंग्जच्या ८ षटकात -१ बाद ९५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या फिल्म बाजार विभागात महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळानं **जीव द क्रीचर** आणि **एप्रिल मे ९९** या दोन चित्रपटांची निवड केली आहे. महाराष्ट्रातल्या आदिवासी कोकणी समाजाच्या परंपरा आणि रूढींवर रवींद्र जाधव दिग्दर्शित जीव द क्रीचर या चित्रपटाने प्रकाश टाकला आहे. तर रोहन मापुस्कर यांच्या एप्रिल मे ९९ या चित्रपटात स्वतःच्या शोधाचा प्रवास आणि उन्हाळ्याच्या सुट्टीच्या आठवणी गुंफलेल्या आहेत. फ्रान्समध्ये येत्या १२ ते २२ मे यादरम्यान कान चित्रपट महोत्सव होणार आहे.

**<><><><><>**

तेल उत्पादक देशांच्या संघटना अर्थात ओपेक आणि विस्तारित ओपेक प्लस संघटनांमधून  बाहेर पडण्याचा निर्णय संयुक्त अरब अमिरातीनं आज जाहीर केला. शेजारील देश सौदी अरेबियाबरोबर निर्माण झालेले तणावपूर्ण संबंध आणि तेल

उत्पादनांवर घातलेल्या मर्यादांमुळे नाराज होऊन युएईनं हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. याची अंमलबजावणी १ मे पासून केली जाणार असल्याची माहिती युएईच्या सरकारी वृत्तसंस्थेनं दिली.

**//<><><><><>//**